**प्रेसनोट** — दि. २३/०१/२०२५

**आरोपी लोकसेवक** श्री. चंद्रकांत लक्ष्मण दोंतूल, पद- वरिष्ठ मुख्य लेखनीक, (वर्ग-३) नेमणूक कर विभाग, सोलापूर महानगरपालिका सोलापूर, रा. घर नंबर १०११ / १०१२ भाग्यनगर, प्रगती चौक, जुना विडी घरकुल सोलापूर जि. सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती स्वतः स्वीकारुन मधून २१,२५५/- रुपयांची कर भरल्याची ऑनलाईन पावती तक्रारदार यांना देऊन उर्वरीत २८,७४५/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यावरुन गुन्हा.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | श्री. चंद्रकांत लक्ष्मण दोंतूल, पद- वरिष्ठ मुख्य लेखनीक, (वर्ग-३) नेमणूक कर विभाग, सोलापूर महानगरपालिका सोलापूर, रा. घर नंबर १०११ / १०१२ भाग्यनगर, प्रगती चौक, जुना विडी घरकुल सोलापूर जि. सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५०,०००/- रुपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५०,०००/- रुपये. |
| **थोडक्यात माहिती** | **पडताळणी व यशस्वी सापळा कारवाई दि. २३/०१/२०२४ रोजी**<br>यातील तक्रारदार यांनी सोलापूर महानगरपालिका हद्दीमध्ये ३००० स्क्वेअर फुट जागा नोटरी पध्दतीने खरेदी केलेली असुन सदर जागेची कर आकारणीस नावाची नोंद करणेसाठी कर विभाग सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथे अर्ज सादर केला असून, सदर अर्जाचे अनुषंगाने यातील तक्रारदार हे पाठपुरावा करत होते.<br>तक्रारदार यांचे ३००० स्क्वेअर फुट नोटरी पध्दतीने खरेदी केलेल्या जागेची कर आकारणीस नोंद करण्याकरीता कर आकारणी व कर संकलन विभाग, महानगर पालिका सोलापूर येथील वरिष्ठ मुख्य लेखनिक श्री. चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल, यांची भेट घेतली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांनी खरेदी केलेल्या जागेचा ०१/०४/१९९२ पासुन ते ३१/०३/२०२५ पावेतोचा कायदेशीर कर एकुण १,७७,७४५/- रुपये भरण्यास सांगीतले व तेवढा कर भरायचा नसेल तर ५०,०००/- रुपये देण्यास सांगून त्यामधून ०१/०४/१९९२ ते ३१/०३/२०२५ २०२५ पावेतोचा कर भरल्याची पावती देतो असे सांगुन तक्रारदार यांच्याकडुन ५०,०००/- रुपयांचा स्विकार करुन त्यापैकी २१,२५५/- रुपयांची ऑनलाईन कर भरल्याची पावती तक्रारदार यांना देऊन उर्वरीत २८,७४५/- रुपये लाच रक्कम स्वरुपात स्वतः करीता स्वीकारले. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री. शिरीस सरदेशपांडे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि., पुणे.<br>डॉ. शीतल जानवे/खराडे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., पुणे. |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. गणेश कुंभार, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. |
| **सापळा पथक** | सदरची कारवाई उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर.<br>**पोलीस अंमलदार-** पोहेकॉ/ अतुल घाडगे, सलिम मुल्ला, स्वामीराव जाधव, पोशि राजू पवार, चापोह/ राहुल गायकवाड सर्व नेम. ला.प्र.वि., सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सोलापूर जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज, रंगभवन चौक, सोलापूर.

**संकेतस्थळ -** www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल-** www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार ॲप-** acbmaharashtra.net

**टोल फ्री क्रमांक-** १०६४

**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक-** ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

सत्यमेव जयते

**(उमाकांत महाडिक)**
**पोलीस निरीक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर**